CR2020010405

**परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या व दि.०१.०४.२०१५ पूर्वी सेवानिवृत्ती/ बडतर्फी/निधन/राजीनामा इत्यादी कारणास्तव सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या अंशदानाच्या अंतिम परताव्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१९/प्र.क्र.४५०/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ४ जानेवारी, २०२०.

वाचा : १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.
२) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : अंनियो-१००९/प्र.क्र.१/सेवा-४, दि.१२.११.२०१०.
३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक : अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२७.०८.२०१४.

**शासन परिपत्रक**

शासन सेवेत दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजने ऐवजी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" केंद्राच्या "राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेस" सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. काही कर्मचाऱ्यांची सेवा, सेवानिवृत्ती / निधन / बडतर्फ / राजीनामा इत्यादी कारणास्तव दि.०१.०४.२०१५ पूर्वी समाप्त करण्यात आलेली आहे. तथापि, अशा कर्मचाऱ्यांना / त्यांच्या वारसांना परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना खात्यातील अंशदानाच्या जमा रकमेचा परतावा करण्याबाबतचे दावे आहरण व संवितरण अधिकारी यांनी SRKA कडे सादर केलेले नाहीत. परिणामी अशी परतावा प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत.

३. सबब कार्यालय प्रमुख व आहरण व संवितरण अधिकारी यांनी परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू असलेल्या व दि.१.४.२०१५ पूर्वी सेवानिवृत्त / राजीनामा / निधन / बडतर्फ इ. कारणांमुळे सेवा समाप्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे परतावा दावे अधिदान व लेखा कार्यालय / संबंधित कोषागार कार्यालयास **तात्काळ** सादर करावे व प्रलंबित परतावा प्रकरणे १ महिन्याच्या आत निकाली निघतील याची दक्षता घ्यावी. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेंतर्गत अंशदानाच्या रकमांचा परतावा करण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

३.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००१०७१२४२०५२४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793b66f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI,
serialNumber=d4994742192306fcc1dea9aadd3810639506519fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2020.01.07 12:42:54 +05'30'

**(इंद्रजित सं.गोरे)**

**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१)	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२)	महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३)	महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४)	महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५)	संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६)	अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७)	संचालक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
८)	सह संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.
९)	निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१०)	सर्व जिल्हा कोषागारे व उपकोषागारे.
११)	मंत्रालयातील सर्व विभाग.
१२)	सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
१३)	निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.